

» करिअर अपडेट


**वंदना जोशी**

'एमएसआयएचएमसीटी'च्या
ट्रॅव्हल अँड टुरिझम अभ्यासक्रमाच्या समन्वयक


# पर्यटनात मोठ्या रोजगार संधी!

पर्यटन म्हणजे एक व्यक्ती किंवा समूहाने अभ्यास, मनोरंजनासाठी किंवा कामासाठी केलेला प्रवास. फुरसतीच्या वेळात अनेक अनुभव घेण्याचे साधन म्हणून पर्यटनाकडे पाहिले जाते. जागतिक पर्यटनाने अनेक चढ-उतार पहिले आहेत. जागतिक मंदी, नुकतीच येऊन गेलेली कोरोनाची लाट यामुळे पर्यटन ठप्प झालेले दिसले. आता निर्बंध कमी होत असल्याने पर्यटन स्थळांकडे पावले पडायला सुरुवात झाली आहे.

प्राचीनकाळात पर्यटन म्हणजे विविध धार्मिक स्थळे, नवीन प्रदेशांचा शोध तसेच व्यापारासाठी केलेला प्रवास हा एवढाच उद्देश होता. भारतीय पर्यटन प्राचीन असून ते धार्मिक स्थळांशी संबंधित आहे. याचे प्रमुख उदाहरण म्हणजे सम्राट अशोकाने बौद्ध धर्माचा प्रचार व प्रसार करण्यासाठी अनेक स्थळांना भेटी दिल्या. धार्मिक प्रवासासाठी धर्मशाळा उभारण्याची सुरुवातही याच काळात झाली. अर्थशास्त्रामध्ये व्यापाऱ्यांना, व्यापारा निमित्ताने पर्यटन करणाऱ्यांना संरक्षण देण्यात येत असल्याची नोंद आहे. ग्रीक साहित्यामध्ये असे नमूद आहे की, भारतामध्ये प्रवाशांसाठी रस्त्याच्या दुतर्फा झाडे, विहिरी, विश्रामगृहांची व्यवस्था व संरक्षण यांचेही नियोजन होते.

## आंतरराष्ट्रीय पर्यटकांत वाढ

भारतात २०१९मध्ये 'जीडीपी'त पर्यटनाचा ६.९ टक्के हिस्सा होता. याचवर्षी ४ कोटी रोजगार निर्माण झाले होते. भारतातील आंतरराष्ट्रीय पर्यटकांची संख्याही दिवसेंदिवस वाढत आहे. युनेस्को मानांकित ४० भारतीय वारसा स्थळे हे पर्यटकांच्या यादीत प्रथम क्रमांकावर आहेत. पर्यटकांच्या सोयी सुविधांसाठी आवश्यक असलेले मनुष्यबळ निर्माण करणे हे गरजेचे आहे हे जाणून कुशल मनुष्यबळ तयार करण्यासाठी पर्यटन मंत्रालय, भारत सरकारने १९८३मध्ये इंडियन इन्स्टिटयूट ऑफ ट्रॅव्हल अँड टुरिझम मॅनेजमेंट नावाची संस्था स्थापन केली. या शिखर संस्थेचा मुख्य उद्देश वैविध्यपूर्ण अशा पर्यटन व्यवसायाशी निगडीत तत्पर, कार्यक्षम व निष्णांत मनुष्यबळ निर्माण करणे हा आहे. या संस्थेची ग्वाल्हेर, गोवा, भुवनेश्वर, नोएडा, नेल्लोर, शिलाँग येथे केंद्रे आहेत. या ठिकाणी पर्यटनाशी निगडित अनेक अभ्यासक्रम राबविले जातात. तसेच पर्यटनाला आवश्यक अशा विविध विषयांवर संशोधनही केले जाते. पर्यटन व कार्गो, लॉजिस्टिक, योगा व स्वास्थ, ट्रॅव्हल फोटोग्राफी इ. पर्यटनाचा अविभाज्य भाग असणाऱ्या टूर गाईड व आंतरराष्ट्रीय विमानतळावरील इमिग्रेशन अधिकाऱ्यांच्या प्रशिक्षणाची जबाबदारी ही या संस्थेवर आहे.

महाराष्ट्र शासनामध्ये उच्च व तंत्र निकेतन या विभागाद्वारे पर्यटन व्यवस्थापनाला लागणारे मनुष्यबळ निर्माण करण्यासाठी तीन वर्षांचा डिप्लोमा इन ट्रॅव्हल अँड टुरिझम हा अभ्यासक्रम राबविला जातो. या अभ्यासक्रमासाठी महाराष्ट्र राज्य इन्स्टिट्यूट ऑफ हॉटेल मॅनेजमेंट व केटरिंग टेक्नॉलॉजीची केंद्र पुणे, नागपूर आणि ठाणे येथे आहेत. भारत सांस्कृतिकदृष्ट्या संपन्न असून येथे येणाऱ्या व देशांतर्गत प्रवास करणाऱ्या पर्यटनामागे अनेक हेतू आहेत. साहसी पर्यटन, वारसा पर्यटन, व्यवसाय पर्यटन, मेडिकल पर्यटन इ. अनेक कारणासाठी पर्यटन केले जाते. यासाठी पर्यटन क्षेत्रामध्ये कुशल मनुष्यबळाची आवश्यकता आहे, हे सिद्ध होते म्हणूनच या क्षेत्रातील करिअर उपयुक्त ठरू शकते.



» करिअर अपडेट

# साहसी पर्यटन

**डॉ. वंदना जोशी**

भारत हा विविधतेने नटलेला प्रदेश आहे. भारतातील नद्या, पर्वत, समुद्रकिनारे, डोंगराळ प्रदेश, वाळवंट, किल्ले, अरण्ये असे अनेक घटक हे साहसी पर्यटनाचे पायाभूत घटक आहेत. यामध्ये पर्यटक पाण्यात जाऊन पाण्याखालील प्राणी व समुद्री जीवांचा अनुभव घेऊ शकतात, अवघड अशा पर्वत चढण्याचा किंवा विमानातून उडी घेऊन हवेत उडण्याचा अनुभव घेऊ शकतात.

साहसी पर्यटन हा एक पर्यटनाचा प्रकार सध्या मुख्यत्वे तरुण वर्गामध्ये फार प्रचलीत आहे. साहसी पर्यटन म्हणजे दुर्गम भागात जाऊन प्रवास करणे व तिथे पर्यटकाने अनपेक्षित गोष्टीची अपेक्षा ठेवणे होय. यासाठी पर्यटकाला त्याच्या कम्फर्टझोनमधून बाहेर यावे लागते.

भारतामध्ये पर्यटकाचा साहसी पर्यटनाकडे ओढा वाढताना दिसून येत आहे. साहसी पर्यटन मुख्यत्वे गिर्यारोहण, रॅफ्लिंग, रॉक क्लायंबिंग, स्किइंग, ट्रेकिंग, पॅरासेलिंग, पॅराग्लायडिंग, बंजी जंपींग, स्कुबा डायव्हिंग इत्यादी प्रकारांत विभागले गेले आहे.

भारताचा साहसी पर्यटनाचा जागतिक पातळीवर ९५ वा क्रमांक आहे, व त्यामध्ये सर्वात जास्त ५०.८ टक्के पर्यटक हे जमिनीवरील (land based) साहसी पर्यटक आहेत. सन २०१९ मध्ये ३,००,११,४११ भारतीय पर्यटक व ४,५८,२७८ परदेशी पर्यटकांनी साहसी पर्यटनाचा अनुभव घेतला आहे. भारतातील या पर्यटनाला कुशल मनुष्यबळाची अत्यंत आवश्यकता आहे. कारण सध्या १,२७५ साहसी पर्यटकांमागे १ साहसी टूर ऑपरेटर असे समीकरण आहे.

## करिअरसाठी आवश्यक कौशल्ये...

- उत्साह, आत्मविश्वास व धैर्य हे गुण. यासोबत संभाषणकौशल्य, नम्रता व टाइम मॅनेजमेंट.
- पर्यटन परिसराची इत्थंभूत माहिती- ज्यामध्ये निसर्गसंबंधित इतिहास, ताज्या घटना घडामोडी, सांस्कृतिक वारसा आदींचा समावेश.
- उत्तम फिटनेस, निर्णयक्षमता व क्रायसिस मॅनेजमेंट.
- सस्टेनॅबिलिटी- ज्यामध्ये निसर्गाचे व तेथील संस्कृतीचे संवर्धन व संरक्षण करता येते.

## काही महत्त्वाच्या संस्था...

गिर्यारोहण हा साहसी पर्यटनामधील मुख्य प्रकार असून त्यासाठी प्रशिक्षणाची गरज आहे. अनेक संस्था गिर्यारोहणाचे शॉर्ट टर्म अभ्यासक्रमाद्वारे प्रशिक्षण देत आहेत. मात्र, त्याहीसाठी डिप्लोमा इन ट्रॅव्हल ॲण्ड टुरिझम किंवा पर्यटनाशी संबंधित इतर अभ्यासक्रम आधी केला असल्यास उत्तम.

- नेहरू इन्स्टिट्यूट अँड माऊंटेनिअरिंग, उत्तर काशी (उत्तराखंड)
- अटलबिहारी वाजपेयी इन्स्टिट्यूट ऑफ माऊंटेनिअरिंग अँड अलाइड स्पोर्ट्स, मनाली (हिमाचल प्रदेश)
- जवाहरलाल इन्स्टिट्यूट ऑफ माऊंटेनिअरिंग अँड विंटर स्पोर्ट्स, पहलगाम (जम्मू-काश्मीर)
- हिमालयन माऊंटेनिअरिंग इन्स्टिट्यूट, दार्जिलिंग (पश्चिम बंगाल)
- हिमालयन ॲडव्हेंचर इन्स्टिट्यूट, मसुरी (उत्तराखंड)
- नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ माऊंटेनिअरिंग अँड अलाइड स्पोर्ट्स, दिरांग (अरुणाचल प्रदेश)
- इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ ट्रॅव्हल अँड टुरिझम मॅनेजमेंट फॉर वॉटर स्पोर्ट्स, गोवा
- गार्डियन गिरिप्रेमी इन्स्टिट्यूट ऑफ माऊंटेनिअरिंग, पुणे (सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या संयुक्त विद्यमाने)

या व्यतिरिक्त अनेक खासगी संस्था भारतामध्ये विविध ठिकाणी पर्यटनाचे छोटे अभ्यासक्रम राबवित आहेत.

## साहसी पर्यटनामधील रोजगाराच्या संधी

नैसर्गिक आव्हानांना एक्स्प्लोअर करण्यासाठी आवश्यक असलेले मुख्य असे मनुष्यबळ :

- ॲडव्हेंचर टूर आपरेटर, ॲडव्हेंचर स्पोर्ट्स ट्रेनर, वाइल्ड लाईफ व ॲडव्हेंचर फोटोग्राफर, टीम बिल्डिंग प्रोग्रॅमर, वॉटर व एरोस्पोर्ट्स स्पेशालिस्ट, निसर्ग अभ्यासक इत्यादी.

## » करिअर अपडेट

डॉ. वंदना जोशी



# वारसा पर्यटन

भारत हा उत्तमोत्तम वारसास्थळांनी समृद्ध असा देश आहे. वारसा म्हणजे आपल्या पूर्वजांकडून मिळालेल्या गोष्टी, वस्तू, कला, लोककला किंवा संस्कार. वारसा हा त्या काळातील, त्या विशिष्ट भौगोलिक विभागातील विचारशैली, धार्मिक, सामाजिक अभिसरणाचे, विचार प्रवाहाचे आणि त्याचबरोबर समृद्धीचे प्रतिनिधित्व करतात. वारसा हा कलेचा, ज्ञानाचा ठेवा असून त्याचे संवर्धन करून पुढच्या पिढीकडे पोहोचवणे आपले कर्तव्य आहे आणि यात पर्यटन क्षेत्र महत्त्वाचे काम करते. पर्यटनाद्वारे वारसा स्थळाची माहिती देश-विदेशातील पर्यटकांना होत असते.

युनेस्को, युनायटेड नेशन्स एज्युकेशनल, सायंटिफिक अँड कल्चरल ऑर्गनायझेशनमध्ये 'वर्ल्ड हेरिटेज' हा विभाग आहे. तो जगातील अशा सांस्कृतिक, ऐतिहासिक, कलात्मक, नैसर्गिक वास्तू यांचे संवर्धन आणि संरक्षण करतो. वारसा पर्यटन म्हणजे एक किंवा अनेक वास्तू, कला आणि उत्सव यांचा अनुभव घेण्यासाठी केलेला प्रवास. वारसा पर्यटनासाठी राजवाडे, गड, किल्ले, लेण्या, धार्मिक स्थळे त्याचबरोबर लोककला व अन्य गोष्टींचा समावेश होतो.

भारताचा युनेस्को जागतिक वारसा स्थळांच्या यादीत सहावा क्रमांक लागतो. भारतात एकूण ४० जागतिक वारसा स्थळे आहेत. जागतिक पर्यटन संस्थेच्यानुसार ३१ टक्के पर्यटक वारसा व सांस्कृतिक पर्यटक आहेत. त्यामध्ये आगामी वर्षांत १५ टक्के वाढीची अपेक्षा आहे. भारतात येणाऱ्या पर्यटकांपैकी ५४ टक्के लोक भारतातील वारसास्थळाने, कला, शास्त्रीय नृत्य याने प्रभावित होतात. वारसा पर्यटन हा भारतीय पर्यटनामधील मुख्य घटक आहे. त्यासाठी केंद्र सरकार विविध उपक्रम राबवीत असतात. भारतातील वारसास्थळांची माहिती आणि त्याचे महत्त्व पर्यटकांपर्यंत पोचविण्याचे काम पर्यटनक्षेत्र करते. त्यासाठी कुशल मनुष्यबळाची आवश्यकता आहे. यामध्ये करिअर करण्यासाठी इतिहासाची पदवी अभ्यासक्रम पूर्ण असणे गरजेचे आहे. पर्यटनाच्या पूर्ण माहितीसाठी डिप्लोमा इन ट्रॅव्हल्स अँड टुरिझम किंवा पर्यटनाशी संबंधित अभ्यासक्रम पूर्ण असल्यास फायदा होतो.

### कोणत्या रोजगाराच्या संधी...

- हेरिटेज गाइड
- म्युझियम गाइड
- हेरिटेज टूर ऑपरेटर

### अपेक्षित कौशल्ये

- **इतिहासाचे ज्ञान** : या क्षेत्रासाठी ते आवश्यक आहे. त्यामुळे पर्यटकाला संबंधित स्थळाबाबत अचूक माहिती देता येऊ शकते.
- **वारसा स्थळाबद्दलची उत्सुकता** : यामुळे वारसा परिसर, त्याचे सांस्कृतिक, ऐतिहासिक, सामाजिक महत्त्व याची पूर्ण माहिती मिळते.
- **नेतृत्वगुण आणि संभाषण कला** : पर्यटकांना योग्य पद्धतीने माहिती द्यायची असल्याने नेतृत्वगुण आवश्यक आहे. त्याचबरोबर संभाषण कला गरजेची आहे. ओघावत्या शैलीत पर्यटकांना माहिती देता आली पाहिजे. यासाठी भारतीय वास्तुकलेचे ज्ञान गरजेचे आहे.

**» करिअर अपडेट**

डॉ. वंदना जोशी

# आरोग्य, वैद्यकीय पर्यटन

'अतिथी देवो भवः' ही भारतीय संस्कृती आहे आणि हेच पर्यटनाचे मूलभूत तत्त्व आहे. सांस्कृतिक, ऐतिहासिक, नैसर्गिक, विविधतेने नटलेल्या भारताची वैद्यकीय समृद्ध परंपरा आपल्याला वेदकाळात घेऊन जाते. त्याचबरोबर चरक संहिता व सुश्रुत संहितेमध्येही आधुनिक उपचार पद्धती व शस्त्रक्रियेचा उल्लेख आहे.

निसर्गोपचार, युनानी, आयुर्वेदिक व होमिओपॅथी या उपचार पद्धतीचा वापर ॲलोपॅथी बरोबर भारतात होतो. भारतातील प्रसिद्ध अशा योग व ध्यान धारणेचा प्रसार व वापर जगभरात झालेला आहे. वैद्यकीय पर्यटनामध्ये परदेशात जाऊन अनेक आजारांवरील जागतिक दर्जाचे उपचार किंवा शस्त्रक्रियेसाठी केलेला प्रवास असला तरी रुग्णांना घरी असल्याची जाणीव सेवांद्वारे करून देण्यात येते. भारतातील आरोग्य पर्यटनामध्ये पर्यटकांच्या उपचार व शस्त्रक्रियेनंतर त्यांना भारतामध्ये विविध व मुबलक असणाऱ्या पर्यटन स्थळांमध्ये विश्रांतीसाठीची व्यवस्था केली जाते.

२०१९मध्ये जगभरात सुमारे १.४० कोटी लोकांनी आरोग्य व वैद्यकीय कारणासाठी प्रवास केला आहे. भारताचा वैद्यकीय पर्यटनामध्ये ४६ देशांच्या यादीत दहावा क्रमांक आहे. अफगाणिस्तान, पाकिस्तान, ओमान, बांगलादेश, मालदीव, नायजेरिया, केनिया, इराक या देशातील पर्यटक कॅन्सरवरील उपचार, दंत उपचार, कॉस्मेटिक व प्लास्टिक सर्जरी इतर उपचारांसाठी भारतात येतात. भारत हा वैद्यकीय पर्यटनासाठी योग्य हा देश ओळखला जात असून त्यासाठी अनेक घटक कारणीभूत आहेत. उपचार पद्धतीची गुणवत्ता, त्यासाठी उपलब्ध श्रेणी, आंतरराष्ट्रीय मानकांनुसार पायाभूत सुविधा, सुसज्ज दवाखाने, कुशल व योग्य डॉक्टर, शून्य प्रतीक्षा कालावधी आणि सर्वांत मुख्य जागतिक दर्जाच्या सेवा परवडणाऱ्या किमतींमध्ये, 'ग्लोबल वेलनेस टुरिझम' हा वैद्यकीय पर्यटनाचा एक भाग आहे.

वैद्यकीय पर्यटनामध्ये पर्यटकांसाठी व त्यांच्या सोबत येणाऱ्या व्यक्तींसाठी मेडिकल व्हिसा, विमान तिकिटे, हॉस्पिटल, इन्शुरन्स कंपन्यांशी समन्वय, विमान तळावरून हॉस्पिटल किंवा हॉटेलमध्ये आणण्याची व्यवस्था त्याचबरोबर त्यांच्यासाठी उपचारानंतर पर्यटनस्थळावरील राहण्याची इतर गोष्टींची व्यवस्था करण्यासाठी पर्यटन क्षेत्रातील कुशल मनुष्यबळाची आवश्यकता असते. मुंबई, नवी दिल्ली, चेन्नई, कोलकता, गुरगाव, बंगळूर, हैदराबाद आणि त्रिवेंद्रम ही शहरे आरोग्य पर्यटनासाठी प्रसिद्ध आहेत. येथे उपचार घेऊन पर्यटक जवळच्या पर्यटन स्थळाला भेट देऊन, विश्रांती घेऊन पर्यटनाचा अनुभव व आनंद घेऊ शकतात.

भारत सरकार या पर्यटनासाठी इ-मेडिकल व्हिसा व परदेशी पर्यटकांसाठी दिल्ली, मुंबई, चेन्नई, बंगळूर, हैदराबाद, गोवा व कोलकता येथे सुविधा केंद्रांची उभारणी केली आहे.

वैद्यकीय पर्यटनासाठी भारतामध्ये काही संस्था, प्रमाणपत्रे, डिप्लोमा, पदव्युत्तर पदविका आणि एम.बी.ए असे अभ्यासक्रम राबविण्यात येतात. त्यामध्ये एथिकल अँड लीगल प्रोसिजर व त्यासंबंधी उद्‌भवणाऱ्या समस्या, वैद्यकीय प्रणाली भारतातील मुख्य व वैद्यकीय पर्यटनाच्या सेवा देणारे रुग्णालये इ. माहितीचा समावेश आहे. त्यासाठी डिप्लोमा इन ट्रॅव्हल अँड टुरिझम ज्यामध्ये वैद्यकीय पर्यटन हा एक विषय आहे किंवा पर्यटनाशी संबंधित अभ्यासक्रम केल्यास उपयुक्त ठरू शकतो. वैद्यकीय पर्यटनासाठी अपेक्षित कौशल्ये, जेणेकरून परदेशी पर्यटकाला आवश्यक असे उत्तम रुग्णालये निवडण्यास मार्गदर्शन होऊ शकते.




## आवश्यक कौशल्य

- वैद्यकीय पर्यटनासाठी प्रसिद्ध व उपयुक्त असणाऱ्या विविध स्थळांचे उत्तम ज्ञान.
- आरोग्य सेवा, त्यासंबंधीचे कायदे व नियम, रुग्णालये, त्याचे रेटिंग, प्रायसिंग, मान्यता इ. माहिती.
- मेडिकल व्हिसाची पूर्ण माहिती आणि उत्तम संभाषण व नेतृत्व गुण

या क्षेत्रात 'कस्टमर रिलेशनशिप मॅनेजर' व 'मेडिकल टूर कन्सल्टंट या स्वरूपात रोजगाराच्या संधी उपलब्ध आहेत.



» करिअर अपडेट

डॉ. वंदना जोशी

# बिझनेस पर्यटन



भारत प्राचीन काळातही व्यापारासाठी प्रसिद्ध होता. भारतातून प्रामुख्याने मसाल्याचे पदार्थ जगभरात पाठवले जातात. त्याकाळात सिल्क रूट हा व्यापारी मार्ग जगभरात प्रसिद्ध होता. हा मार्ग युरोप व आशिया खंडांना जोडला होता. याच व्यापारी व्यावसायिक किंवा देवाणघेवाणासाठी केलेल्या प्रवासाचे सध्याचे स्वरूप म्हणजे 'बिझनेस पर्यटन' होय. या पर्यटनाला जगभरात एम.आय.सी.ई. (MICE) पर्यटन (एम (मीटिंग), आय (इन्सेन्टिव्ह), सी (कॉन्फरन्स), इ (एक्झिबिशन)) म्हणून ओळखले जाते.

हे पर्यटन एकाच उद्देशासाठी अनेक लोकांना एकत्र येऊन आयोजित केले जाते. या पर्यटनामधील प्रवास हा ज्ञान, तंत्रज्ञान यांची देवाण- घेवाण किंवा प्रसार याचबरोबर व्यावसायिक करार, बैठक, प्रदर्शन इ. स्वरूपातील प्रवास होय. या पर्यटनामध्ये विविध क्षेत्रातील कर्मचारी मुख्यत्वे माहिती व तंत्रज्ञान कंपन्या, ऑटोमोबाईल, आरोग्य क्षेत्र, उत्पादन क्षेत्र, अभियांत्रिकी क्षेत्रातील कर्मचारी देश-विदेशातील शहरांना प्रशिक्षणासाठी, कार्यशाळेसाठी किंवा परिषदेसाठी भेट देतात. दिवसभर नोकरीशी संबंधित कामे करून संध्याकाळी किंवा आपल्या सोयीनुसार पर्यटक शहरातील आणि परिसरातील पर्यटन स्थळांना भेटी देतात. हे पर्यटक हे इतर पर्यटकांपेक्षा १.४ टक्के अधिक खर्च करतात.

## पर्यटनाचे प्रकार

१ **एम (मीटिंग)** : सभा, संमेलन किंवा बैठक यात विशिष्ट विषयाची माहिती किंवा प्रसारासाठी केलेले आयोजन व त्यासाठीचा प्रवास होय. यामध्ये अनेक व्यक्ती सहभागी होतात.

२ **आय (इन्सेन्टिव्ह)** : यात सहभागींना त्यांच्या मागील सर्वोत्कृष्ट कामगिरीबद्दल पुरस्कृत केले जाते. कर्मचाऱ्यांना पुढील वर्षांमध्ये अधिक चांगले काम करण्यास प्रोत्साहित करण्यासाठी देश-विदेशातील सुंदर पर्यटनस्थळी नेले जाते.

३ **सी (कॉन्फरन्स)** : यात परिषद किंवा अधिवेशनामध्ये चर्चासत्र, समस्या सोडवणे, संशोधन, सल्ला मसलत, सादरीकरण, कार्यशाळा, माहिती देवाण-घेवाणासाठीच्या प्रवासाचा तसेच सामाजिक विषयाशी निगडित परिषदांचा समावेश आहे.

४ **ई (एक्झिबिशन)** : नवीन उत्पादने व सेवा, माहिती व विक्रीसाठी प्रदर्शित केल्या जातात. विशिष्ट क्षेत्राशी निगडित हजारो लोक प्रदर्शनाला भेट देतात.

या सर्व बिझनेस पर्यटनामध्ये पर्यटक त्यांच्या कंपनीसाठी प्रवास करतो. या प्रवासाची जबाबदारी कंपनी घेते. हा प्रवास खूप आधी ठरलेला असतो किंवा कामाच्या गरजेनुसार कर्मचाऱ्याला तत्पर प्रवास करावा लागतो. या पर्यटनामध्ये कर्मचाऱ्यांसाठी उत्तम दर्जाच्या सोयी-सुविधांचा अंतर्भाव केला जात असल्यामुळे देशाच्या आर्थिक प्रगतीसाठी नवीन पर्याय म्हणून ओळखले जात आहे. पर्यटन अभ्यासक्रमात या पर्यटनाचा समावेश आहे. डिप्लोमा इन ट्रॅव्हल अँड टुरिझम किंवा पर्यटनाशी निगडित इतर कोणताही अभ्यासक्रम करून या क्षेत्रात काम करता येते. ट्रॅव्हल एजन्सी व्यतिरिक्त या क्षेत्रात कॉर्पोरेट ट्रान्सपोर्ट ऑपरेटर, कॉर्पोरेट तिकिटींग, इन्सेन्टिव्ह प्लॅनर, इव्हेंट कॉर्डिनेटर, ग्रुप अॅक्टिव्हिटी प्लॅनर म्हणून काम करता येते.

## आवश्यक कौशल्ये

- नेतृत्व गुण व संभाषण
- निगोसिएशन
- संशोधन ग्राहकांबद्दलची अधिक माहिती
- आय. टी. समस्या सोडविण्याचे ज्ञान
- टीम वर्क
- अॅबिलिटी टू वर्क टू डेडलाइन्स
- सादरीकरण

करिअर अपडेट

डॉ. वंदना जोशी

# कृषी पर्यटन : संस्कृतीला रोजगाराची जोड

भारताची जगभरात कृषिप्रधान देश म्हणून ओळख आहे. भारत हा शेतीमधील विविधतेसाठी जगप्रसिद्ध आहे. वेगवेगळ्या भागातील शेती, पिकांमधील विविधता कृषी पर्यटनाचा मूलभूत घटक आहे. आणि हीच विविधता पर्यटकांना कृषी पर्यटनासाठी प्रेरणा देते. भारतातील अंदाजे ६५ टक्के लोकसंख्या ही शेती आणि शेतीशी निगडित व्यवसायांवर अवलंबून आहे. कृषी व्यवसाय हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा आहे. परंतु, आजही भारतातील लोक याकडे व्यवसाय म्हणून नव्हे तर संस्कृती म्हणूनच बघतात. कृषी पर्यटनामध्ये, पर्यटकाला फार्महाउसमध्ये राहण्यासाठी, शेतीच्या कामात सहभाग घेण्याची आणि पारंपरिक खाद्यपदार्थ खाण्याची संधी मिळते. यामध्ये काही विशेष अॅक्टिव्हिटीज आयोजित केल्या जातात. मुख्यत्वे बैलगाडी, ट्रॅक्टर चालविणे, भात लागवड करणे, पक्षी निरीक्षण, पतंग उडवणे, मासेमारी इ. गोष्टींचा समावेश आहे. कृषी पर्यटन हे कृषी व पर्यटन यांच्या समन्वयातून निर्माण झाले आहे. कृषी पर्यटन शेतकऱ्यांसाठी खूप महत्त्वाचे ठरत आहे. ज्यात पर्यटकांच्या राहण्याचा, जेवणाचा आणि इतर अॅक्टिव्हिटीजसाठी आकारलेल्या शुल्कातून उत्पन्न मिळते. या व्यतिरिक्त कृषी पर्यटनामध्ये पर्यटक त्यांच्या भेटीदरम्यान थेट शेतातील ताजी फळे, भाज्या, धन्य खरेदी करतात त्यामुळे शेतमालाला योग्य भाव मिळतो. म्हणूनच ग्रामीण भागात रोजगाराच्या संधी वाढत आहेत. कृषी पर्यटनाचा, शहरी लोकांना ग्रामीण जीवनाची, तेथील संस्कृतीची ओळख व अनुभव मिळवून देण्याबरोबरच ग्रामीण शेतकरी वर्गाला रोजगाराच्या माध्यमातून आर्थिक स्थैर्य देण्याचा व्यापक दृष्टिकोन आहे.

शहरातील कल्लोळ, तणावपूर्ण वातावरण, प्रदूषण यापासून दूर जाण्याचा मार्ग म्हणजे कृषी पर्यटन. यातील लहान कालावधीच्या सहलींमध्ये पर्यटक आसपासच्या ग्रामीण ठिकाणांना भेटी देतात. निसर्गाच्या सानिध्यात जाऊन तेथील लोकसंस्कृती, लोकांचे जीवनमान, खाद्यसंस्कृती आणि पारंपरिक लोककलेचा अनुभव घेतात. पर्यटकांची त्याचदरम्यान भेटलेल्या माणसांशी नकळतपणे घट्ट नाळ जोडली जाते. अॅग्री टुरिझम डेव्हलपमेंट कॉर्पोरेशननुसार, शहरी लोकांना गावाकडच्या जीवनमानाचे आणि शेतीविषयक गोष्टींचे प्रचंड आकर्षण आणि उत्सुकता आहे. आणि म्हणूनच या पर्यटनाचा पाय भक्कमपणे रोवला गेलेला आहे. कृषी पर्यटन ही युरोपातील संकल्पना भारत रुजविण्याचे काम पांडुरंग तावरे यांनी केले. कृषी पर्यटनाला प्रोत्साहन देणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य आहे. महाराष्ट्र राज्याने कृषी पर्यटनाचे महत्त्व जाणून महाराष्ट्र राज्य पर्यटन धोरणामध्ये कृषी पर्यटनाला विशेष सुविधा दिल्या आहेत.

महाराष्ट्रात ३० जिल्ह्यांमध्ये ३२८ कृषी पर्यटन स्थळे आहेत. आंबा महोत्सव, संत्री महोत्सव, द्राक्ष महोत्सव अशा विविध महोत्सवांद्वारे कृषी पर्यटनाला प्रोत्साहन दिले जात आहे. पर्यटनाच्या मूलभूत माहितीसाठी डिप्लोमा इन ट्रॅव्हल अँड टुरिझम किंवा पर्यटनाशी संबंधित इतर कोणताही अभ्यासक्रम केल्यास फायदा होतो. यामध्ये ट्रॅव्हल एजंट म्हणून सहली, शैक्षणिक सहली, लहान व शालेय विद्यार्थ्यांसाठी सुट्ट्यांमधल्या सहली कृषी पर्यटन केंद्राच्या समन्वयाने काढू शकतात.

## आवश्यक कौशल्ये :

- **ग्रामीण जीवनशैलीबद्दलची उत्सुकता :** यामध्ये ग्रामीण जीवन, शेती, तेथील राहणीमान, लोककला, हस्तकला इ. माहितीचा समावेश आहे.
- **ज्ञान :** पर्यटन परिसराचे ज्ञान, वन्यजीवन व भौगोलिक ज्ञान
- संवाद कौशल्य.
- निगोशिएशन स्किल.






» करिअर अपडेट

डॉ. वंदना जोशी

पर्यटन म्हणजे वेगवेगळ्या कारणांसाठी केलेला प्रवास. ज्यात वारसा पर्यटन, साहसी पर्यटन, आरोग्य पर्यटन आदी स्वरूपाच्या पर्यटनांमध्ये आवश्यक असा घटक म्हणजे प्रवासी वाहतूक. पर्यटनस्थळ दूर असल्यास प्रवासाचा सर्वोत्तम पर्याय म्हणजे हवाई वाहतूक. यामध्ये पर्यटकांचा पर्यटनस्थळापर्यंत पोहोचण्याच्या वेळेबरोबरच कष्टही कमी होतात. हवाई वाहतूक हा पर्यटन व्यवसायाचा कणा आहे. हवाई वाहतूक विकास आणि पर्यटन विकास हे एकमेकांवर अवलंबून असून, परस्परांना पूरकही आहेत. सुमारे ५८ टक्के आंतरराष्ट्रीय प्रवासी भारतातील पर्यटन प्रवासासाठी हवाई वाहतुकीचा पर्याय निवडतात. आजकाल देशांतर्गत सहलींसाठीही विमान सेवेचा समावेश टूर ऑपरेटर्सकडून पर्यटकांसाठी केला जातो. नागरी विमान वाहतूक महासंचालनालयाने सादर केलेल्या अहवालानुसार, जानेवारी ते मार्च २०२२ या कालावधीमध्ये २.४८ कोटी प्रवाशांनी देशांतर्गत विमान वाहतुकीद्वारे प्रवास केला आहे. या वाढीचे प्रमाण ८६.७४ टक्के एवढे आहे. भारतातील आठ शेड्यूल एअरलाइन्स, भारतातील आणि भारताबाहेरील विविध पर्यटनस्थळांना जोडतात. इंडिया ब्रँड इक्विटी फाउंडेशन, वाणिज्य व उद्योग मंत्रालयाच्या २०१८मधील सर्व्हेनुसार, अंतर्गत विमान वाहतुकीसाठी भारत जगातील तिसऱ्या क्रमांकाचा देश आहे. लो कॉस्ट कॅरिअरचा विस्तार व देशातील बदलत्या आर्थिक वातावरण यामुळे विमान प्रवासाचा विस्तार होत आहे. त्यामुळे सामान्यांनाही विमान प्रवास करता येतो. भारत सरकारनेही विमान वाहतुकीला प्रोत्साहन देण्यासाठी वेगवेगळ्या योजना सुरू केल्या आहेत. उदा. उडान. या सर्वांचा एकत्रित परिणाम म्हणजे या क्षेत्रात रोजगाराच्या संधी उपलब्ध होत आहेत आणि त्यातील काही विभागासाठी पर्यटनातील कुशल मनुष्यबळाची आवश्यकता असते.

पर्यटन क्षेत्रातील मूलभूत ज्ञान जसे की, ट्रॅव्हल जिओग्राफीसाठी डिप्लोमा इन ट्रॅव्हल अँड टुरिझम किंवा पर्यटनासंबंधी इतर कोणत्याही अभ्यासक्रमानंतर इंटरनॅशनल एअर ट्रान्स्पोर्ट असोसिएशनचा (आएटीए) फेअर्स अँड तिकिटिंगचा अभ्यासक्रम केल्यास अधिक फायदा होतो. आयएटीए अभ्यासक्रमध्ये जीडीएस व फेअर कॅलक्युलेशनचा समावेश असून, ते आंतरराष्ट्रीय तिकिटिंगसाठी गरजेचे आहे. यामध्ये पर्यटनक्षेत्राचे ज्ञान असलेल्यांना एअर तिकिटींग स्टाफ, एअरपोर्ट ग्राउंड स्टाफ, पॅसेंजर रिझर्व्हेशन अँड तिकिटींग, कस्टमर सर्व्हिस एजंट, एअरलाइन कॉल सेंटरमध्ये संधी आहेत.

## हवाई वाहतूक क्षेत्रासाठी आवश्यक कौशल्ये...

१. **भूगोलाचे ज्ञान** : यात ट्रॅव्हल जिओग्राफी- वेगवेगळ्या देशातील वेळ, मुख्य विमानतळे यांचा समावेश आहे.

२. **तांत्रिक ज्ञान** : विमान कंपन्यांचे तिकिटिंग आणि इतर सर्वकामे संगणकाद्वारे होत असल्यामुळे तांत्रिक ज्ञान आवश्यक आहे.

३. **प्रभावी संवाद कौशल्य**

४. **विमान कंपन्यांची आणि त्याच्या नियमांची माहिती**

» करिअर अपडेट डॉ. वंदना जोशी



# खुणावतात निसर्गाच्या वाटा..!

'अतुल्य भारत' ही भारत सरकारने पर्यटनाला प्रोत्साहन देण्याच्या आणि प्रसाराच्या उद्देशाने चालवलेली मोहीम आहे. 'अतुल्य भारत' ही संकल्पना फक्त भारतीय संस्कृती, येथील निसर्ग सौंदर्य, ऐतिहासिक स्थळे यापुरतीच मर्यादित नाही, तर व्यापक संकल्पना असून त्यात जैवविविधतेचाही समावेश आहे. भारताचा १ लाख १४ हजार किलोमीटर एवढा प्रदेश वन्यजीव, वने यासाठी राखीव आहे. जगभरात सहलीसाठी जाण्यामागचे मुख्य कारण म्हणजे वाइल्ड लाइफचा अनुभव घेणे. विविध प्रकारच्या वनस्पती, अरण्ये आणि प्राण्यांच्या प्रजातींमुळे भारताला जैविक राजधानी म्हटले तर वावगे ठरणार नाही. निसर्गप्रेमी, फोटोग्राफर, वाइल्ड लाइफ प्रेमी, हनिमूनर हे वाइल्ड लाइफ पर्यटनासाठी जाणारे मुख्य पर्यटक आहेत. भारतात १०६ राष्ट्रीय उद्याने आणि ५६४ वन्यजीव अभयारण्ये आहेत. त्यातील सात अभयारण्यांना युनेस्कोने जागतिक वारसा स्थळ म्हणून घोषित केले आहे.

भारतातील राष्ट्रीय उद्यानात व अभयारण्यात वन्यजीवांचे संरक्षण आणि त्यांची वाढ होत असल्याने भारतात वाइल्ड लाइफ पर्यटनाला चालना मिळत आहे. जवळपास १५ टक्क्यांनी पर्यटन संख्येत वाढ झाली आहे. विशेषतः भारतीयांना वाइल्ड लाइफचे खूप आकर्षण असल्याने ७० टक्के पर्यटक भारतीयच आहेत. वाइल्ड लाइफ पर्यटनामध्ये पर्यटक त्यांच्या आवडीच्या राष्ट्रीय उद्यानात, अभयारण्यात सहलीसाठी जातात. तेथील निसर्गरम्य वातावरणात मुक्काम करून सकाळी, सायंकाळी सफारी घेऊन, अभयारण्यातील वन्यप्राणी, पक्षी व वनस्पतींचा अनुभव घेतात. या सहलीमध्ये त्यांना खूप शिकायला मिळते. पर्यटकांच्या भेटीमुळे अभयारण्याचा विकास होतो. त्याचबरोबर परिसरातील लोकांना रोजगार मिळतो. या मिळणाऱ्या रोजगारामुळे वन्यजीवांचे शिकारीपासून संरक्षण होत आहे.

पर्यटनाच्या मूलभूत माहितीसाठी डिप्लोमा इन ट्रॅव्हल अँड टुरिझम किंवा पर्यटनाशी संबंधित इतर कोणताही अभ्यासक्रम यासाठी उपयोगी ठरतो. यामध्ये ट्रॅव्हल एजन्सी व्यतिरिक्त ट्रीप लीडर, वाइल्ड लाइफ कॅम्प, वाइल्ड लाइफ टूर प्लॅनर, वाइल्ड लाइफ ट्रॅव्हल अँड डॉक्युमेंटरी फोटोग्राफर म्हणून काम करता येते.

### आवश्यक कौशल्ये

- निसर्गाची आवड
- पर्यटन परिसराचे परिपूर्ण ज्ञान, उदा. मुख्य वाइल्ड लाइफ, पर्यटनासाठीचा उत्तम काळ, राहण्याची व वाहतुकीची व्यवस्था. याबाबतची माहिती असावी.
- भाषेवर प्रभुत्व
- वाइल्ड लाइफबद्दलची उत्सुकता



» करिअर अपडेट

डॉ. वंदना जोशी

# टुरिस्ट गाइड अर्थात सांस्कृतिक राजदूत

पर्यटकांच्या सहलीमध्ये विविध स्मारके, किल्ले, संग्रहालये, राजवाडे यांचा समावेश असतो. एखादे स्मारक किंवा किल्ला त्याचे महत्त्व, त्याचा इतिहास, शैली व त्यातील बारकावे याची माहिती न घेतल्यास त्या पर्यटनस्थळाला दिलेली भेट पूर्ण झाली असे म्हणता येत नाही. या कारणासाठी आपल्याला पर्यटनस्थळी 'टूरिस्ट गाइड'ची आवश्यकता भासते. 'टुरिस्ट गाइड' हा पर्यटन स्थळासाठी विशेष मार्गदर्शक म्हणून काम करतो.

टूरिस्ट गाईडला त्या देशाचा 'सांस्कृतिक राजदूत' म्हणून ओळखले जाते. त्यांच्यावर देशाची प्रतिमा अवलंबून असते. देशात येणारा पर्यटक टुरिस्ट गाइड सोबत विविध पर्यटनस्थळांना भेटी देत असताना, टुरिस्ट गाइड पर्यटनस्थळाच्या माहिती व्यतिरिक्त अनेक गोष्टींची माहिती देतो शिवाय शंकांचे निरसनही करतो. देशातील, त्या-त्या राज्यातील मुख्य पिके, संस्कृती, कला, मुख्य उद्योग, हवामान, शिक्षण पद्धती इ. अनेक पैलूंची ओळख पर्यटकांना करून देत असतो.

टूरिस्ट गाइड व टूर एस्कॉर्ट हा टूर ऑपरेटर व पर्यटकांमधील दुवा आहे. 'टूर एस्कॉर्ट' हा देश विदेशातील सहलीसाठी त्यांचा पर्यटक सोबती म्हणून सहली यशस्वी व सुरळीत करण्यासाठी मार्गदर्शन करतो. मुख्यतः ट्रॅव्हल एजन्सीमधील अनुभवी आणि आवड असलेले कर्मचारी टूर एस्कॉर्ट म्हणून सहली सोबत जातात. टूर एस्कॉर्टलाही सहलीदरम्यान विशिष्ट पर्यटन स्थळांसाठी टूरिस्ट गाईडची आवश्यकता असते. उदा. सिटी गाइड, म्युझियम गाइड, पार्क गाइड इ.

यासाठी डिप्लोमा इन ट्रॅव्हल अँड टुरिझम किंवा पर्यटनाशी निगडित इतर अभ्यासक्रमाबरोबर इतिहासाची माहिती असल्यास अधिक फायदेशीर ठरते. भारत सरकारच्या पर्यटन मंत्रालयाने टुरिस्ट गाइडचे प्रशिक्षण देण्यासाठी 'इनक्रेडेबल इंडिया टुरिस्ट फॅसिलिटेर सर्टिफिकेशन प्रोग्रॅम' हा डिजिट अभ्यासक्रम सुरू केला आहे. त्याद्वारे आपल्या वेळेनुसार हा अभ्यासक्रम पूर्ण करून सर्टिफाईड टूरि गाइड बनू शकता. भारतामध्ये प्राचीन आणि इतर अनेक स्मारके आहेत. त्यातील अंदाजे ३ हजार ६१ स्मारके हे भारतीय पुरातत्त्व विभागातील संरक्षित आहेत. सर्व स्मारकांची खऱ्या अर्थाने माहिती येणाऱ्या पर्यटकांपर्यंत पोहोचवण्यासाठी टूरिस्ट गाइड या करिअरला खूप वाव आहे. टूरिस्ट गाइड हा टूर कंपनीशी समन्वय साधून किंवा फ्री-लान्सर म्हणूनही काम करू शकतो. टूरिस्ट गाइड या करिअरसाठी आपणास इतिहास, भूगोल, कला, समाजशास्त्र, वाहतूक आदींचे ज्ञान असणे आवश्यक आहे.

## या क्षेत्रासाठी आवश्यक कौशल्ये

- **प्रसन्न व्यक्तिमत्त्व**
- **प्रभावी संवाद साधता येणे**
- **बोलका स्वभाव**
- **हजरजबाबीपणा**
- **नेतृत्वगुण**
- **जमावाला खिळवून ठेवण्याची कला**
- **गुड कस्टमर स्किल्स**
- **टाइम मॅनेजमेंट अँड इंटर पर्सनल स्किल्स**
- **परकी भाषा**



» करिअर अपडेट

डॉ. वंदना जोशी



# छायाचित्रण, लेखनाची पॅशन

लेखन आणि छायाचित्र हे पर्यटनामधील विशेष घटक आहेत. दूरच्या व न पाहिलेल्या पर्यटनस्थळांना भेट देऊन त्याबद्दलची माहिती संकलित करण्यासाठी हा पैलू खूप मदत करतो. लेखनाबरोबरच छायाचित्र काढण्याची आवड, कला पर्यटकांना त्या पर्यटनस्थळांना भेट देण्यास प्रेरणा देतात.

**लेखन (ट्रॅव्हल रायटिंग)** : देश-विदेशातील वेगवेगळ्या पर्यटनस्थळांना उदा : राजवाडे, किल्ले, मंदिर इत्यादी व त्याचबरोबर अभयारण्य, रिसॉर्ट, ट्रेक इत्यादीला भेट देऊन त्याबद्दलची परिपूर्ण माहिती विविध माध्यमातून पुढील काळात भेट देणाऱ्या पर्यटकांसाठी देण्याचे काम लेखनाद्वारे करता येते. यासाठी लेख लिहिणाऱ्यास इतिहास, टोपोग्राफी (topography), भूगोल, संस्कृती व कला यांची माहिती असणे आवश्यक आहे. त्याचबरोबर पक्षपात न करताही संकलित केलेली माहिती साध्या व सरळ भाषेत मांडता आली पाहिजे.

पर्यटनाच्या मूलभूत माहितीसाठी डिप्लोमा इन ट्रॅव्हल अँड टुरिझम किंवा पर्यटनाचा इतर कोणताही अभ्यासक्रमाव्यतिरिक्त भाषेचा किंवा पत्रकारितेचा अभ्यासक्रम केला असल्यास अधिक फायदा होतो.

## आवश्यक कौशल्ये...

- उत्तम संवादकौशल्य
- संशोधन कला
- लिहिण्याची आवड
- संपादन क्षमता
- वेळेचे व्यवस्थापन

याशिवाय ई-मेल, एसईओ, वेब अॅनॅलिसिस, कन्टेंट मॅनेजमेंट सिस्टिमची प्राथमिक माहिती असणे आवश्यक.

पर्यटनक्षेत्रामधील मोठ मोठ्या टूर कंपन्यांमध्ये 'ट्रॅव्हल रायटर' किंवा फ्रिलान्सर म्हणूनही काम करू शकता. आता यासाठी सोशल मीडिया हा नवीन पर्यायही उपलब्ध आहे. ट्रॅव्हल ब्लॉगिंगच्या माध्यमातून माहिती देता येते.

**छायाचित्रकार (ट्रॅव्हल फोटोग्राफी)** : पर्यटन आणि छायाचित्र काढण्याची कला याचे उत्तम मेळ असणारे करिअर म्हणजे 'ट्रॅव्हल फोटोग्राफी.' या विशेष कलेच्या माध्यमातून एखाद्या प्रदेशाचे, रमणीय भूप्रदेशाचे, लोकांचे, सांस्कृतिक कार्यक्रमाचे, ऐतिहासिक स्थळाचे फोटोग्राफिक डॉक्युमेंटेशन केले जाते. असे विशेष पैलू दर्शविणारी छायाचित्र हे त्या विभागाचे प्रातिनिधिक प्रतिमा असता 'ट्रॅव्हल फोटोग्राफी' ही वेगवेगळ्या ठिकाणी के जाते व त्यामध्येही प्रावीण्य मिळविले जाते. उ वाइल्ड लाइफ फोटोग्राफी. असे विशेष फोटो ट्रॅव्ह कंपन्या त्याच्या जाहिरातीच्या कामात वापरतात आणि हे फोटो पर्यटनाशी निगडित मासिकासाठी मुख्यत्वे वापरले जातात. यासाठी पर्यटनाच्या अभ्यासक्रमाशिवाय फोटोग्राफीचा अभ्यासक्रम करणे आवश्यक आहे.

## आवश्यक कौशल्ये...

- अटेन्शन फॉर डिटेल्स
- पर्यटनाची आवड
- व्हिज्युअल डिझाइन स्किल
- स्वप्रेरणा
- निर्धार
- तंत्रस्नेही

याद्वारे आपण फ्रिलान्सर ट्रॅव्हल फोटोग्राफर, फोटो जर्नालिस्ट, वाइल्ड लाइफ फोटोग्राफर, ट्रॅव्हल ब्लॉगर, इन्फ्ल्युएन्जर आदी पर्याय उपलब्ध आहेत.

» करिअर अपडेट डॉ. वंदना जोशी

# खाद्यसंस्कृतीची ओळख : कलिनरी टुरिझम

भारतीय खाद्यसंस्कृती प्राचीनकाळापासून जगप्रसिद्ध आहे. पूर्वीच्या काळी राजे, महाराजे यांना खाद्यपदार्थांची आवड होती. त्यांनी या खाद्यसंस्कृतीला खूप प्रोत्साहन दिले. त्यामुळेच भारतात विविध पाककृती निर्माण झाल्या. राजस्थानी, मुघलाई, महाराष्ट्रीयन पद्धतींच्या विविध पाककलांचा आस्वाद घेणे त्यामुळे शक्य झाले. कलिनरी टुरिझम म्हणजेच फूड टुरिझम किंवा गॅस्ट्रोनॉमी टुरिझम होय. या पर्यटनामध्ये पर्यटक, पर्यटनस्थळांना भेटी देण्याबरोबरच तेथील विशेष खाद्यपदार्थांचा आस्वाद घेत त्याची माहिती व ज्ञान मिळवण्यावर विशेष भर दिला जातो

कालिनरी पर्यटनामध्ये स्थानिक खाद्यपदार्थ, पाककला त्याचा इतिहास, तेथील संस्कृती, तेथे राहणाऱ्या स्थानिकांचा कल, पदार्थ तयार करण्यासाठी वापरली जाणारी प्रक्रिया व तंत्रे याबद्दल माहिती दिली जाते. ही माहिती त्या विभागातील परंपरा, संस्कृती व वारसा यांचे प्रतिबिंब असते. भारत हा भौगोलिकदृष्ट्या संपन्न देश असल्यामुळे वेगवेगळ्या भूप्रदेशात विविध पिके, धान्ये येतात व त्याचबरोबर भारताची मसाल्याच्या पदार्थांची परंपरा व लौकिक सर्वमान्य आहे. परिणामी अगणित अशा स्वादिष्ट खाद्यपदार्थांची पर्यटकांना पर्वणीच आपसूकच मिळते.

'वर्ल्ड फूड ट्रॅव्हल असोसिएशन'च्यामते, सर्व पर्यटनाच्या खर्चाच्या साधारण १५ ते ३५ टक्के एवढा खर्च खाद्यपदार्थ व पेय यांचा असतो. भारतीय पर्यटनाच्या बाबतीत हा अंदाजे ४० टक्के एवढा आहे. भारतामध्ये प्रत्येक १०० किलोमीटरला स्थानिक पदार्थामध्ये वेगळेपण आढळून येते. हेच वेगळेपण खाद्य व पाककला पर्यटनाचे मुख्य कारण आहे.

महाराष्ट्रात पुणे, मुंबई आणि कोकण येथे खाद्य पदार्थ व स्थानिक पाककला जाणून घेण्यासाठी विविध सहलींचे आयोजन केले जाते. याव्यतिरिक्त दिल्ली, मुंबई, जयपूर येथील अनेक पंचतारांकित हॉटेलमध्ये निष्णात शेफतर्फे त्या विभागातील विशेष पाककृती शिकवल्या जातात. हाही एक 'कलिनरी टुरीझम'चा एक भाग आहे. तसेच 'कलिनरी टुरिझम'मध्ये कुकिंग क्लासेस, टी टेस्टिंग, वाइन टेस्टिंग, बार क्लॉव्हर्स, कलिनरी ट्रेल्सचा समावेश आहे. या विशेष अशा खाद्यपदार्थ सहलींचा कालावधी चार ते सहा तास एवढा असतो. यामध्ये साधारणतः पाच ते सात विविध प्रकारच्या खाद्य पदार्थांचा आस्वाद घेता येतो. याशिवाय  नेहमीपेक्षा वेगळ्या पर्यटनस्थळांना भेटीही  देता येतात. अशा या नावीन्यपूर्ण व आगामी करिअरकरीता डिप्लोमा इन ट्रॅव्हल अँड टुरिझम किंवा पर्यटनाचा  इतर कोणताही अभ्यासक्रम करणे अधिक फायद्याचे आहे. यासाठी आपल्या विभागातील खाद्यसंस्कृती, अन्नधान्ये, पिके, त्यांचे हंगाम, मसाल्याचे पदार्थ त्याचे विशेष उपयोग तसेच ते पदार्थ तयार करण्याची पद्धती आदींची माहिती आवश्यक आहे. कारण या कलीनरी ट्रेल दरम्यान पर्यटकाला माहिती देण्यासाठी उपयुक्त ठरते.

या विशेष खाद्य पदार्थ व पाककला सहलीसाठी आपल्या विभागातील किंवा शहरातील मुख्य खाद्य पदार्थ, त्यांचे प्रसिद्ध आउटलेट किंवा रेस्टॉरंट, त्याचा दर, तेथील स्वच्छता त्याचबरोबर त्या पदार्थांसोबत दिल्या जाणाऱ्या इतर सहपदार्थांची पूर्ण माहिती असावी. यामध्ये फूड किंवा कलिनरी ट्रेल प्लॅन करून पर्यटकांना गाइड करता येते.

**आवश्यक कौशल्ये**

- उत्तम संवादकौशल्य
- मैत्रीपूर्ण व्यक्तिमत्त्व
- उत्तम ग्राहकसेवा देण्याचे कौशल्य
- इंटरपर्सनल स्किल्स
- स्वतःला उत्तम खाद्यपदार्थांची जाण आणि आवड असणे.



» करिअर अपडेट

डॉ. वंदना जोशी

# ट्रॅव्हल एजन्सी आणि टूर ऑपरेटर

पर्यटन हा भारतातीलच नव्हे तर जगातील वेगाने वाढणारा उद्योग आहे. प्राचीन काळातील पर्यटन हे समुदायाने केले जाणारे होते. परंतु, त्यामागील उद्देश वेगळा होता. तसेच, त्याकाळी पर्यटनाला आवश्यक सोयी सुविधांचा विकास झाला नव्हता. आताच्या पर्यटनात विविध स्थळांचा आनंद घेणे, तेथे आराम करणे, तेथील संस्कृतीची माहिती घेणे त्याचबरोबर मानसिक समाधानाचा आनंद घेणे आदी गोष्टींचा यात समावेश आहे. थॉमस कूकने १८४१मध्ये युरोपात आयोजित प्रवासाचा पाय रोवला आणि तेथूनच ट्रॅव्हल एजन्सीला सुरुवात झाली.

पर्यटनक्षेत्रात ट्रॅव्हल एजंट व टूर ऑपरेटर हे पर्यटकांसाठी विविध घटकांचा व बाबींचा पुरवठा करतात. विमानाचे तिकीट बुक करणे, हॉटेल बुकिंग करणे तसेच देश विदेशातील विविध पर्यटनस्थळांच्या वैयक्तिक व समूह सहली आयोजित करणे ही सगळी कामे ट्रॅव्हल एजंट आणि टूर ऑपरेटर यांच्यामार्फत केले जाते. हे दोघेही पर्यटनासाठीचे अत्यावश्यक माध्यम आहे. पर्यटकांचा प्रवास सुखकर, उत्साहपूर्वक, आनंददायी व वाजवी खर्चात व्हावा यांचे नियोजन करण्याची जबाबदारी यांच्यामार्फत पार पाडली आहे. भारतात २०२०मध्ये साधारण अडीच लाखांपर्यंत लहान मोठ्या ट्रॅव्हल एजन्सीज होत्या. सध्या कोरोना या साथीच्या आजारानंतर पर्यटनावरील निर्बंध दूर होत असल्याने पर्यटनाला चांगले दिवस आले आहेत. परिणामी, या क्षेत्रात करिअरच्या उत्तम संधी उपलब्ध आहेत. पर्यटन क्षेत्राला सर्वात जास्त मनुष्यबळाची गरज आहे. हे कुशल मनुष्यबळ तयार करण्यासाठी भारतात अनेक ठिकाणी विविध स्तरांवर वेगवेगळ्या मुदतीचे अभ्यासक्रम उपलब्ध आहेत. पर्यटकांच्या सहलीचे आयोजन करण्यासाठी ट्रॅव्हल एजन्सी व टूर ऑपरेटर यात सर्वांत जास्त करिअरच्या संधी आहेत. या पर्यटनाच्या क्षेत्रामध्ये करिअर करण्यासाठी डिप्लोमा इन ट्रॅव्हल अँड टुरिझम हा अभ्यासक्रम महाराष्ट्र राज्य इन्स्टिट्यूट ऑफ हॉटेल मॅनेजमेंट व केटरिंग टेक्नॉलॉजी, पुणे व शासकीय तंत्रनिकेतन ठाणे आणि नागपूर येथे उपलब्ध आहे. हा अभ्यासक्रम केल्यास किंवा इतर कोणताही पर्यटनाशी निगडित अभ्यासक्रम केल्यास ट्रॅव्हल एजन्सीमध्ये करिअर करता येते.

ट्रॅव्हल एजन्सीमध्ये प्रवास समुपदेशक, ट्रॅव्हल एजन्सी मॅनेजर, टूर ऑपरेटर, ट्रॅव्हल प्लॅनर, याचबरोबर देशविदेशांतील सहलींसाठी ट्रॅव्हल कन्सल्टन्ट म्हणून काम करता येते. याव्यतिरिक्त रिझर्व्हेशन विभाग, सेल्स अँड मार्केटिंग विभाग, डॉक्युमेंटेशन विभाग



तसेच विदेशी सहलींसाठी व्हिसा व इतर कागदपत्रे तयार करण्यासाठी मुबलक मनुष्यबळ आवश्यक असलेल्या विभागातही काम करता येते.

## या क्षेत्रासाठी आवश्यक कौशल्ये...

- उत्तम संभाषण कौशल्य. त्यामुळे ग्राहकांना त्यांच्या आवडीच्या सहलीची संपूर्ण माहिती देऊन सहलीचे आयोजन करता येईल.
- पर्यटनाची आवड आणि उत्सुकता
- चालू घडामोडीचे ज्ञान आवश्यक आहे. त्यामुळे पर्यटनाचे निर्बंध, देशविदेशातील आर्थिक व राजकीय परिस्थिती, पर्यटनसाठीचा उत्तम कालावधी तेथील हवामानाबद्दलची माहिती, करन्सी रेट इत्यादीबद्दलची माहिती.
- संगणकाचे ज्ञान - तिकीट बुकिंग करण्यासाठी इतर सगळ्या सुविधांचे आरक्षण करण्यासाठी आवश्यक आहे.
- भूगोल व इतिहासाचे ज्ञान
- इंटर पर्सनल स्किल्स
- कस्टमर सर्व्हिस
- संघटन कौशल्ये
- प्रॉडक्ट नॉलेज



» करिअर अपडेट

डॉ. वंदना जोशी

# भटकंतीला करिअरची जोड

प्रवास हा आपल्या जीवनातील अविभाज्य अंग/घटक आहे. प्रवास हा एक उत्तम शिक्षक आहे व ते आपल्या सर्वांगीण विकासासाठी खूप उपयुक्त आहे. ही प्रवासाची आवडीकडे आपण एक करिअर म्हणूनही आता उपलब्ध आहे.

प्रवास हा व्यवसाय, आरोग्यासाठी केला जातो त्याचबरोबर फुरसतीच्या वेळात अनेक अनुभव घेण्यासाठी पर्यटक वेगवेगळ्या देशविदेशातील पर्यटन स्थळांना भेट देतो. त्यामध्ये मुख्यत्वे वारसा पर्यटन, कृषी पर्यटन, निसर्ग पर्यटन इत्यादीचा समावेश आहे.

पर्यटन क्षेत्रामुळे ट्रॅव्हल कंपन्या, हॉटेल, कार रेंटल कंपन्या, विमान कंपन्या, टूर ऑपरेटर, टूरिस्ट गाइड व टूर इस्कॉट इत्यादीचा समावेश असल्यामुळे हे क्षेत्र सर्वात जास्त रोजगार निर्माण करणारे क्षेत्र म्हणून ओळखले जाते. पर्यटन व्यवसायाचा सेवा क्षेत्रात समावेश आहे.

या आगामी व नावीन्यपूर्ण क्षेत्रात वेगवेगळ्या प्रकार प्रवेश घेता येतो. त्यामध्ये दहावी, बारावीनंतर व पदवीनंतरचे अभ्यासक्रम उपलब्ध आहेत. सुरुवात आधी केल्यास या क्षेत्रातील माहिती व अनुभव लोकांशी बोलल्यास हे क्षेत्र करिअरसाठी मोलाचे आहे याची माहिती मिळेल.

पर्यटनाचे महत्त्व ओळखून नववी दहावीच्या भूगोलाच्या विषयामध्ये पर्यटनाची क्षेत्राशी ओळख करण्याविषयी पाठ्याचा समावेश केला आहे. विविध प्रसार माध्यमेही पर्यटनाचे महत्त्व जाणून देत आहेत. पालकही सुट्टयांमध्ये आपल्या कुटुंबीयांसोबत दरवर्षी देश विदेशातील सहलीसाठी जातात. त्या सहली फक्त फुरसतीसाठी नसून त्यामध्ये ही करिअर करता येते हे पालकाने विचारात घेण्यासारखे आहे व नेहमीच्या करिअर पर्यायाऐवजी पर्यटनाचा एक पर्याय म्हणून विचार करता येतो.

दहावीनंतर महाराष्ट्र शासन तंत्रशिक्षण संचालनालयाद्वारे पर्यटन व पदविका अभ्यासक्रम यशस्वीरीत्या राबवीत आहे. हा अभ्यासक्रम खालील ठिकाणी उपलब्ध आहे.

- **महाराष्ट्र राज्य इन्स्टिट्यूट ऑफ हॉटेल मॅनेजमेंट व केटरिंग टेक्नॉलॉजी, पुणे.**
- **शासकीय तंत्रनिकेतन. ठाणे.**
- **शासकीय तंत्रनिकेतन, नागपूर.**

त्या व्यतिरिक्त काही विद्यापीठात व महाविद्यालयात पर्यटन संबंधित वेगवेगळे अभ्यासक्रम आहेत. जसे की मास्टर्स इन टुरिझम ॲडमिनिस्ट्रेशन, एम.बी.ए. इन टुरिझम ॲण्ड ट्रॅव्हल मॅनेजमेंट, बॅचलर ऑफ ट्रॅव्हल ॲण्ड टुरिझम आदी. यामध्ये बारावी तसेच पदवीनंतर प्रवेश घेऊन पर्यटन क्षेत्रात करिअर करता येते.